सकाळ

# ‘रवळनाथ’ सहकारातील सावली देणारा वटवृक्ष

## नंदिनी आवडे : गडहिंग्लजमध्ये सहकार सप्ताहानिमित्त बचत गट मेळावा

■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १५ : प्रत्येकाचे घराचे स्वप्न साकार व्हावे, या उद्देशाने गरजेतून श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची स्थापना झाली. विविध उपक्रमांमधून रवळनाथ नेहमीच सर्वांच्या पाठीशी उभी राहिली आहे. त्यामुळे ही संस्था सहकारातील सावली देणारा वटवृक्ष आहे, असे गौरवोद्‌गार नंदिनी आवडे (आयएएस) यांनी काढले.

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी व श्री महालक्ष्मी वुमेन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे सहकार सप्ताहानिमित्त महिला बचत गटांचा मेळावा झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. रवळनाथ संस्था समूहाचे प्रमुख एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. रवळनाथच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.




गडहिंग्लज : रवळनाथतर्फे आयोजित बचत गट मेळाव्यात नंदिनी आवडे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, डी. के. मायदेव, उत्कर्षा पोतदार, प्राची मायदेव आदी उपस्थित होते.

श्री. चौगुले म्हणाले, ‘महिला सबलीकरण चळवळीला रवळनाथने कृतिशील जोड दिली आहे. महिलांच्या उन्नतीसाठी व्यवसाय प्रशिक्षण वर्ग, व्यवसाय वृध्दीसाठी सुलभ अर्थसहाय्य दिले आहे. त्यातून अनेक दुर्बल घटकांतील महिलांचे व्यवसाय उभे राहिले आहेत.’ मीना रिंगणे यांचे भाषण झाले. अनिता पाथरवट, कविता लोहार, सुप्रिया पाटील, दीपाली चव्हाण, सीमा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. सीईओ डी. के. मायदेव आदी उपस्थित होते. महालक्ष्मीच्या अध्यक्षा उत्कर्षा पोतदार यांनी स्वागत केले. संचालिका कल्पना पाटील यांनी प्रास्ताविक केले. मानद सचिव गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्षा प्राची मायदेव यांनी आभार मानले.

### सेल्फ मेड शहर

■ गडहिंग्लजच्या मातीमध्ये ऊर्जा आहे. कोणत्याही शासकीय किंवा राजकीय पुढाऱ्यांच्या आधाराने हे शहर प्रगतीपथावर आलेले नाही. हे शहर सेल्फ मेड शहर आहे, असेही नंदिनी आवडे यांनी मत व्यक्त केले.